




डोअर स्टेप स्कूल
११०, आनंद पार्क,
औंध, पुणे ४११००७
☎ २५८९८७६२/२५४३२१६५
ई–मेल : dsspune@vsnl.net

Sankalpaa Graphics Ph. 24387117

# गोष्टी इकडच्या तिकडच्या गमती जमतीच्या (भाग–१०)

## सुहो आणि पांढरा घोडा



प्रकाशक:
डोअर स्टेप स्कूल
११०, आनंद पार्क,
औंध, पुणे ४११००७
☎ २५८९८७६२
२५४३२१६५
ई–मेल : dsspune@vsnl.net

डोअर स्टेप स्कूल
५२/५३ जे.एस. म्युनसिपल स्कूल
नाना चौक, ग्रँन्ट रोड
मुंबई ४००००७
☎ २३८२६३४३/२३८५९२०३

© डोअर स्टेप स्कूल

किंमत रू. १०.००/–

तिसरी आवृत्ती :
मार्च २००४
कव्हर :
बी. सुहासिनी
आतील चित्रे :
कॉम्प्युटर ग्रॅफिकस आणि
संपदा भानप, शमा जोशी व
बी. सुहासिनी

# सुहो आणि त्याचा पांढरा घोडा

मंगोलियातील लोककथा

चीन देशाच्या उत्तरेला मंगोलियामध्ये एक लांबच लांब पसरलेला गवताळ प्रदेश आहे. ह्या प्रदेशातले लोक पूर्वीपासून मेंढया, घोडे, गाई वगैरे पाळून उपजीविका करतात. तोच त्यांचा पोटापाण्याचा धंदा.

आपल्याकडे सारंगी असते तसेच एक वाद्य मंगोलियातही आहे. त्याला मंगोलीयन भाषेत जे नाव आहे ना त्याचा अर्थ 'घोडयाचे डोके असलेले वाद्य' असा होतो.



नावाप्रमाणेच ह्या वाद्याला वरच्या बाजूला घोडयाच्या डोक्याचा आकार दिलेला असतो. ह्या वाद्याचा आकार असा का असतो आणि त्याला असे नाव का पडले ह्याविषयी एक गोष्ट सांगतात, ती अशी–

फार पूर्वीची गोष्ट. मंगोलियातल्या गवताळ भागात एक सुहो नावाचा गरीब मेंढपाळ मुलगा होता. त्याला वडील नव्हते. घरात फक्त तो आणि त्याची आई रहात होते. सुहो वयाने लहान होता पण त्याला खूप समजूत होती. आपली आई एकटी आहे. तिला आपणच मदत केली पाहिजे हे त्याला माहित होते. त्यामुळे सकाळी उठल्यापासून तो रात्री झोपेपर्यंत आईची निरनिराळी कामे करायचा.

सकाळी लवकर उठायचा. आईला स्वयंपाकासाठी काय लागेल ती मदत करायचा आणि मग आपल्या शेळयामेंढया घेऊन रानात जायचा. शेळयांना चरायला सोडले की दिवसभर



त्यांच्यामागे हिंडायचे.



कधी कधी आजुबाजूचे दुसरे गुराखी जमवून गप्पा मारायच्या, गाणी म्हणायची आणि संध्याकाळ झाली की घरी परतायचे. सुहो गाणी फार छान म्हणायचा. शेळयांपाठीमागे हिंडता हिंडता ह्याचे गाणे गुणगुणणे चालूच असायचे.

एक दिवस संध्याकाळी सगळे आजुबाजूचे गुराखी घरी परत आले. तरी सुहो मात्र घरी

आला नाही. सुहोच्या आईला काळजी वाटली. तिने आजूबाजूला जाऊन चौकशी केली पण कोणालाच काही माहित नव्हते. काय करावे, कुठे शोधावे असा सगळेजण विचार करताहेत तेवढयात त्यांना सुहो लांबून येतांना दिसला.

उशीर झाला म्हणून धावतपळत धापा टाकत सुहो घरी पोहोचला. कुणी काही विचारायच्या आतच आपल्या हातातले घोडयाचे शिंगरू (घोडयाचे लहान पिल्लू) सर्वांना दाखवत तो म्हणाला, "उशीर का झाला ते सांगतो. हे शिंगरू आहे ना हे मी परत येतांना मला वाटेत दिसले. बिचारे जमिनीवर पडले होते. जवळपास कोणी नव्हते. आजूबाजूला कोणी दिसते का, त्याचा मालक किंवा त्याची आई कुठे सापडते का म्हणून मी खूप शोधले. पण कोणीच नव्हते. काय करावे कळेना. ह्याला जंगलात तसाच सोडून आलो तर रात्री लांडगे येऊन त्याला खातील असा विचार करून शेवटी मी त्याला उचलले आणि घरी



आणले."

दुसऱ्या दिवशी सुहोने खूप तपास केला. पण घोडयाचा मालक काही सापडला नाही. तो घोडा सुहोकडेच राहिला. सुहो त्याची छान काळजी घ्यायचा. त्याला वेळेवर खायला प्यायला दे, प्रेमाने त्याच्या पाठीवर हात फिरव, हळूवारपणे त्याचे केस साफ कर अशी सगळी कामे सुहो अगदी मनापासून करायचा. बघताबघता पिल्लू मोठे झाले. त्याचा रंग अगदी पांढरा शुभ्र होता. कुठेही दुसऱ्या रंगाचा ठिपकादेखील नव्हता. त्यामुळे सुहोचा घोडा एकदम उमदा, पांढरा पांढरा शुभ्र, अगदी परीकथेतल्या राजपुत्राच्या घोडयासारखा दिसायचा.



सुहोचा घोडा नुसता दिसायलाच उमदा होता असे नाही तर तितकाच निधडया छातीचा, अगदी कुणालाही न भिणारा होता. एक दिवस रात्री सुहोला झोपेतून अचानक जाग आली. बाहेरून शेळयामेंढयाच्या ओरडण्याचा बराच मोठा आवाज येत होता. शेळया का ओरडता आहेत, लांडगा वगैरे आला आहे की काय असं वाटून सुहो एकदम ताडकन ऊठला आणि घराबाहेर पळाला.दारात येऊन बघतो तर क़ाय कुंपणाबाहेर एक भला मोठा लांडगा आपला आक्राळविक्राळ जबडा उघडून उभा आहे. त्याच्या समोर पाय घट्ट रोवून त्याला आडवायला उभा आहे पांढरा घोडा. लांडगा थोडा जरी पुढे आला तरी पांढरा घोडा इतक्या जोराने खिंकाळायचा (घोडयाच्या आवाजाला 'खिंकाळणे' म्हणतात) की त्या आवा़जाला घाबरून लांडगा जागच्या जागीच थांबायचा. हे असे बराच वेळ चालले



असणार कारण पांढरा घोडा घामाने अगदी निथळत होता आणि लांडगाही धापा टाकीत होता.



सुहो लांडग्याला मारायला म्हणून एकदम पुढे झाला. सुहोला पुढे येतांना बघूनच लांडग्याने माघार घेतली. तो धूम ठोकून जंगलात पळाला.

सुहोने पांढऱ्या घोडयाला एकदम मिठीच मारली. "एवढया मोठया लांडग्याला तू एकटयानं पळवून लावलंस, त्याच्याशी सामना केलास, किती दमलास, किती घामाघूम झालास" असं म्हणत

म्हणत सुहोनं घोडयाची पाठ थोपटली, त्याचं सगळं अंग पुसून काढलं, त्याला प्रेमाने खाऊ घातलं. आपल्या घोडयाला कुठे ठेऊ आणि कुठे नको असं त्याला झालं. दुसऱ्या दिवशी जो जो भेटेल त्याच्याजवळ सुहोची आपली एकच गोष्ट– 'माझ्या घोडयानं लांडग्याला पळवलं'. गोष्ट ऐकता ऐकता कोणीतरी कौतुकानं म्हटलं "सुहो, तुझा घोडा म्हणजे अगदी हिरा आहे हिरा", झालं त्या दिवसापासून सुहोच्या घोडयाचं नाव पडलं 'हिरा'.

सुहो हिरावाचून एक क्षणभरही विसंबायचा नाही (एकटा सोडायचा नाही). जिथे सुहो तिथे हिरा जिथे हिरा तिथे सुहो असचं जणुं काहीं समीकरण झालं. असेच दिवस चालले होते. सुहो हळूहळू मोठा होत होता आणि हिराही. एक दिवस शेजारच्या देशातल्या राजाने घोडयांची शर्यत लावली आहे अशी बातमी आली. सुहोचे मित्र, शेजारी पाजारी, सगळे सुहोला म्हणाले,



"सुहो, तू जा हिराला घेऊन. आपला हिरा नक्की शर्यत जिंकेल." सर्वांनी आग्रह केला म्हणून सुहो निघाला शर्यतीला. त्याच्याबरोबर काहीं मित्रही गेले. तिथे गेल्यावर समजलं की शर्यत साधीसुधी नव्हती. तो राजकन्येच्या स्वयंवरचा पण होता. जो कोणी शर्यत जिंकेल त्याला राजा आपली मुलगी देणार होता आणि अर्ध राज्यही देणार होता. शर्यत सुरू झाली.



प्रत्येकाने आपापल्या घोडयांना टाच माराली. घोडे वाऱ्यासारखे निघाले. बघताबघता सुहो आणि हिरा सर्वांच्या कितीतरी पुढे गेले. कुणाला काही समजायच्या आतच सुहो दुसऱ्या टोकाला जाऊन पोहोचलासुध्दा. सुहो जिंकला म्हणून राजाच्या शिपायांनी जाहीर केले. सुहो राजासमोर जाऊन अदबीने उभा राहिला. राजा मात्र सुहोकडे बघून एकदम चपापला. 'हा गरीब मेंढपाळ माझा जावई होणार? हे कसं शक्य आहे? ह्याचा घोडा फार छान आहे. हा घोडा त्याच्याकडून विकत घेऊ. बक्षिस म्हणून कार्ही पैसे देऊ आणि परत पाठवू. ह्याला राजकन्याही द्यायची नाही आणि राज्यही द्यायचे नाही', असा मनाशी विचार करून राजा सुहोला म्हणाला, "काय रे पोरा, कितीला देणार हा घोडा ?" "महाराज , मी हा घोडा विकायला आणलेला नाही. मी फक्त शर्यतीत भाग घ्यायला आलो होतो", सुहो म्हणाला. राजाला सुहोचे उत्तर आवडले नाही.



त्याने सुहोला पुन्हाः म्हटले, "एवढा उमदा घोडा तुला काय करायचाय ? काय किंमत हवी असेल ती घे आणि मुकाटयानं परत जा." पण सुहो काही ऐकेना. सर्वांच्या समोर हा भिकारडा आपला अपमान करतो असे वाटून राजाला फार राग आला. त्याने शिपायांना हुकूम केला, "घ्या रे ह्याचा घोडा ह्याच्याकडून हिसकावून आणि लावा हाकलून याला." झाले, राजाचा हुकूम सुटला. सगळे शिपाई सुहोवर आणि त्याच्या घोडयावर तुटून पडले. सुहो बिचारा एकटा पडला. त्याचे मित्रदेखील घाबरून गेले. राजाच्या शिपायांपुढे कोण काय करणार ? शिपायांचा मार खाऊन खाऊन सुहो जमिनीवर बेशुध्द पडला. हिरानेही सुटण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण शिपायांनी त्याला पकडून, जेरबंद करून राजाच्या तबेल्यात (घोडयाला बांधतात त्या ठिकाणाला तबेला म्हणतात. जसे गाईचा गोठा किंवा मोटारीचे गॅरेज तसा घोडयांचा

तबेला) नेऊन बांधले.

शर्यतीला आलेली सर्व मंडळी आपापल्या घरी गेली. सुहोला त्याच्या मित्रांनी उठवले, पाणी पाजले, आणि हळू हळू करत आपल्याबरोबर घरी नेले.

सुहोला बघून त्याच्या आईला तर रडूच आले. तिने सुहोला हळूच घरात नेले. हलक्या हातानी त्याच्या जखमा धुतल्या, त्यावर मलमपट्टी केली, त्याला गरम गरम जेवू घातले आणि अंथरूणावर झोपावले. आणि आपण त्याच्या शेजारी बसून राहिली. कधी त्याचं डोक चेप तर कधी त्याचे पाय असं आपलं रात्रभर चाललेलं. कुठून तरी सुहोला आराम पडावा म्हणून तिचे प्रयत्न चालू होते.

हळू हळू करीत सुहोच्या जखमा भरल्या. तो हिंडू फिरू लागला. रोजचे कामही करू लागला पण त्याचे मन मात्र कशात लागेना. सारखा आपला हिराचाच विचार. काय करीत



असेल माझा हिरा, काय खात असेल, काय पीत असेल, कोणी त्याला मारत तर नसेल ना?, असे अनेक प्रश्न त्याच्या मनात यायचे. पण करणार काय ?

इकडे राजा मात्र हिरा मिळाला म्हणून फारच खूश होता. असा पांढरा शुभ्र उमदा घोडा त्याच्याकडे तर नव्हताच पण त्याच्या माहितीतही दुसऱ्या कुणाकडे नव्हता.

राजाकडे कुणीही खास पाहुणे आले की राजा त्यांना आपला नवा घोडा दाखवायचाच. एक दिवस असाच कुणासमोर तरी राजा हिराचं प्रदर्शन करीत होता. बोलता बोलता त्याच्या मनात काय आलं कुणास ठाऊक त्याने हिरावर स्वार होण्याचं ठरवलं. पण हिरा सावधच होता. आजपर्यंत त्याने सुहोशिवाय कुणालाच आपल्या पाठीवर बसू दिलं नव्हतं. राजा आपल्यावर स्वार होणार हे लक्षात येताच हिरा एकदम उधळला. अचानक गोंधळून जाऊन राजा खाली

पडला. पाहुण्यांसमोर आपली फजिती झाली हे बघून तो रागाने लालबुंद झाला. “पकडा त्या घोडयाला.जेरबंद करा”, राजाने हुकूम सोडला. “असा हातात सापडला नाही तर सरळ बाणांचा वर्षाव करा. मग पुढे कुठे जातो ते पाहुया.” राजाचा हुकूम, मग शिपाई कशाला घाबरतात तेही आपापल्या घोडयांवर स्वार झाले आणि निघाले हिराच्या पाठीमागे.



पण हिरा काय त्यांच्या हातात सापडतो थोडाच. तो निघाला वा-याच्या गतीनं. शिपाई पाठलाग



करून दमले आणि त्यांनी ठरविले की आता बाणच मारायचे. झालं, सगळीकडून बाण सुटले. त्यातील कितीतरी हिराच्या अंगात घुसले आणि कितीतरी बाहेर पडले. पण हिरा काही थांबला नाही. तो बघता बघता दिसेनासा झाला. बिचारे शिपाई हात हलवीत परत गेले.

इकडे रात्रीची वेळ. सुहोचा नुकताच डोळा लागला होता. आई पण निजायच्या तयारीतच होती तेवढयात तिला बाहेर कसलातरी आवाज आल्यासारखे वाटले. बाहेर जाऊन बघते तर काय समोर सगळीकडे बाण घुसलेले, तोंडातून फेस गळतोय, अंगातून घामाच्या धारा लागल्या आहेत, धड उभेसुध्दा राहवत नाही अशा अवस्थेतला हिरा होता. ती धावतच घरात गेली. तिने सुहोला उठवले, “सुहो उठ, बाहेर बघ कोण आहे. हिरा, आपला हिरा.” हिराचं नाव कानी पडताच सुहो ताडकन उठला आणि धावतच बाहेर आला. समोर हिराला बघून त्याला हसावं

की रडावं तेच कळेना. "अरे अरे हिरा, काय रे ही तुझी दशा, किती रे हे बाण आणि असा धावत आलास माझ्यासाठी, केवळ माझ्यासाठी", असं म्हणत, एकीकडे रडत, एकीकडे हळूहळू हिराला थोपटत सुहो एकेक बाण बाहेर काढू लागला. पण बाण बाहेर निघाला की त्याजागी मोठी जखम उघडी पडे आणि त्यातून नळाची धार लागावी तशी रक्ताची धार लागे.



एक एक बाण काढता काढता हिराचं किती रक्त गेलं त्याला सुमारच नाही. धावून



धावून आधीच दमलेला तो मुका जीव अंगात त्राण न राहून खाली बसला. सुहोकडे एकदा करूण नजरेनं पाहून हिरानं बिचाऱ्यानं सुहोच्या खांद्यावरच प्राण सोडला.

'हिरा हिरा' करून सुहोनं आकांत केला. हिरा कुठेतरी असेल, कधीतरी भेटेल अशा आशेवर तो इतके दिवस जगत होता. आतां ती आशाही संपली.

सर्वांनी सुहोला समजावण्याचा खूप प्रयत्न केला, पण सुहो काही हिराजवळून हलेना. त्याच्या डोक्यात सतत एकच विचार, "माझा हिरा. माझ्यामुळे त्याचे एवढे हाल झाले. मी शर्यतीलाच गेलो नसतो तर. माझ्यासाठी जीवाच्या आकांताने इथपर्यंत आला. पण मी काही त्याला वाचवू शकलो नाही." समोर हिराचे निष्प्राण कलेवर आणि शेजारी सुन्न होऊन बसलेला सुहो. बसल्या बसल्या डोळा लागेल तेवढीच

झोप, बाकी खाणे नाही की पिणे नाही. कुणाशी बोलणे चालणे काही काही नाही.

असाच एकदा सुहोचा डोळा लागला. झोपेत त्याला एक स्वप्न पडले. स्वप्नात त्याला दिसला त्याचा हिरा. पूर्वी दिसायचा तसाच. तगडा, उमदा, पांढरा पांढरा शुभ्र, तजेलदार. त्याने सुहोला हाक मारली. "सुहो उठ, असा रडू नकोस. मी तुझ्याजवळ नाही. आपली दोघांची ताटातूट झाली म्हणूनच रडतोस ना ? मग मी सांगतो ते नीट ऐक. तसेच कर, म्हणजे मी सतत तुझ्याजवळ राहीन. आपल्या दोघांना कोणीही एकमेकांपासून दूर करू शकणार नाही.

हे बघ, माझी हाडं, माझी कातडी, माझ्या शरीरातल्या नसा, माझे केस ह्या सगळयांचा उपयोग करून एक वाद्य बनव. असं केलस तर मी सतत तुझ्याजवळच राहीन. कधीदेखील तुला सोडून जाणार नाही." एवढं बोलून हिरा दिसेनासा झाला. हिरा, हिरा म्हणतच सुहो झोपेतून जागा



झाला. आपल्याला स्वप्न पडलं. हिरा आपल्या स्वप्नात आला, भेटला ह्या विचारांनच त्याला खूप बरं वाटलं. हिरानं काय सांगितलं तेही त्याला आठवलं आणि तो लगेच कामालाही लागला. हिराची कातडी, हाडं, केस वापरून हळूहळू त्यानं एक वाद्य तयार केलं. त्या वाद्यावरून हळूहळू हात फिरवला. त्यातून मधूर स्वर बाहेर पडले, जणु सुहोची आणि हिराची पुर्नभेटच झाली. तेच हे 'अश्वशीर्ष' किंवा 'घोडयाचे डोके असलेले वाद्य'.

सुहो आता कुठेही गेला की ते वाद्य त्याच्याबरोबर असायचंच. त्या वाद्यातून इतके गोड आणि करूण स्वर बाहेर पडायचे की ऐकणाराही हेलावून जायचा.

असे म्हणतात की आपल्या शेळयामेंढया रानात चरायला सोडून सुहो वाजवायला बसला की त्याचे वाजवणे ऐकून दूरदूरचे लोक तर त्याच्याभोवती गोळा व्हायचेच पण पशुपक्षीही

भान हरपून ऐकत रहायचे.



मंगोलियाच्या गवताळ प्रदेशात आजही सुहोच्या, हिराच्या वाद्याचे स्वर ऐकू येतात आणि ऐकणाऱ्याच्या काळजाला जाऊन भिडतात.

□□□

लेखन: रजनी परांजपे



# आमची पुस्तके

अ-गट
पुस्तकमाला भाग-१ (मुळाक्षरे)
पुस्तकमाला भाग-२ (आकार)
पुस्तकमाला भाग-३ (ईकार)
पुस्तकमाला भाग-४ (उकार)
पुस्तकमाला भाग-५ (एकार)
पुस्तकमाला भाग-६ (ऐकार)
पुस्तकमाला भाग-७ (ओकार)
पुस्तकमाला भाग-८ (औकार)

ब-गट
मुळाक्षरांचे पुस्तक
कान्याचे पुस्तक
वेलांटीचे पुस्तक
उकारांचे पुस्तक
एका मात्रेचे पुस्तक
दोन मात्रांचे पुस्तक
ओकाराचे पुस्तक
औकाराचे पुस्तक

जोडाक्षरांचा सराव - २ भाग
कोडीच कोडी मजाच मजा - २ भाग
लहान शब्दकोश
गोष्टी इकडच्या तिकडच्या गमती जमतीच्या
हस्तपुस्तिका
बहिस्थ परिक्षेसंबंधीची माहिती
वयाचा दाखला कसा काढावा ?
शालेय वाचनालय चालवताना